MHKO120001682009

# <u>निशाण क्रमांक १०५ खालील आदेश.</u>

( ऊर्मिला कुलकर्णी वि. अविनाश पाटील वगैरे )

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७, प्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार प्रस्तुत दावा, त्याने प्रतिवादी विरुद्ध वाटपासाठी व कब्जासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने यापूर्वी दुरुस्ती केलेली आहे. मात्र सदर दुरूस्ती करताना नजरचुकीने दावा मिळकत प्रतिवादींच्या हिश्शात देणेचे ठरल्याबाबत व दावा मिळकत वगळेणेबाबतचा मजकूर लिहिण्यात आला आहे. त्यामुळे, सदर मजकूर दुरुस्त होणे आवश्यक आहे. सबब, वादींना त्या अनुषंगाने त्यांच्या दाव्याच्या कथनांमध्ये दुरुस्ती करण्याची आहे.

०३. वादी पुढे असे कथन करतात की, त्यांना उभय पक्षकारांमधील वाद गुणदोषांवर निर्गत करण्यासाठी सदरची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तसेच, सदरच्या दुरुस्तीनंतर दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून त्यामुळे वादी व इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट, सदर अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, सदर अर्ज मंजूर होण्याबाबत वादींनी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी प्रस्तुत अर्जावर न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश होणेबाबत विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०६. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व दावा दुरुस्तीच्या अर्जाने जर दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, वादीने प्रस्तुत अर्ज हा दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटनांमुळे दाखल केलेला आहे. तसेच, दावा दुरुस्तीनंतर प्रतिवादींना सुद्धा त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी मिळणार आहे.

०७. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशारितीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदरचा मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करावी व आवश्यक पक्षकारांना सामील करावे.

३. वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.07.20 16:37:52 +0530

स्थळ : गारगोटी. ( व्हा. बी. मुल्ला )
दिनांक : २०/०७/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.